# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे- ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनीक्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/५९
Telephone : 020-25621156/57/59
ईमेल/Email :approval@unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
वेबसाइट/Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र : सीसीओ/६४२ दिनांक : ०३/०३/२०२५

प्रति,
अध्यक्ष/सचिव
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था

**विषय — संचालक, प्राचार्य व इतर शिक्षकीय रिक्त पदे नियमित स्वरूपात त्वरित भरण्याबाबत...**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेली महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये विद्यार्थी संख्येनुसार कार्यभार तपासून घेऊन विहित प्रक्रियेचा अवलंब करुन नियमित प्राचार्य/संचालक तसेच अध्यापकीय पदे भरण्याची कार्यवाही करणेबाबत परिपत्रक क्र. १३८/२०२४, जावक क्र. सीसीओ/१९८३, दि. ११ जून, २०२४ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

उक्त परिपत्रकामध्ये विद्यापीठाने दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करुन संबंधित संस्था/महाविद्यालयातील नियमित अध्यापकीय पदे भरण्याची कार्यवाही करणे आवश्यक असतानाही बऱ्याचशा महाविद्यालयांनी अध्यापकीय पदे भरण्याची कार्यवाही सुरु केली नसल्याचे विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निदर्शनास आलेले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम, २०१६ मधील कलम १०८ (१)(च) मधील तरतुदीनुसार संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची संख्या, अर्हता इ. या विद्यापीठाने व राज्य शासनाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असणे आणि त्या अभ्यास, पाठयक्रम, अध्यापन/प्रशिक्षण/संशोधन यांच्याकरिता कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असणे आवश्यक आहे. तसेच सदर अधिनियमातील कलम १०८ (१)(क) मधील तरतुदीनूसार विद्यापीठाच्या आदेशांचे/निर्देशांचे अनुपालन करणे प्रत्येक संलग्न महाविद्यालय आणि मान्यता प्राप्त परिसंस्था यांचेवर बंधनकारक आहे.

यासंदर्भात प्राप्त आदेशानुसार कळविण्यात येते की, उक्त परिपत्रकाप्रमाणे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन नियमित कायमस्वरुपी प्राचार्य/संचालक व अध्यापकीय पदे तातडीने भरण्याची कार्यवाही सुरु करावी, अन्यथा अशा संलग्न महाविद्यालयांची मान्यता प्राप्त परिसंस्थांची विद्यापीठाच्या पोर्टलवर असलेली बी ओ डी (**BOD**) ऑनलाइनची सेवा बंद करण्यात येईल, तसेच त्यांचेविरुध्द महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) एकरुप परिनियम, २०१८ मधील तरतुदीनुसार उचित कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आपला,

4/3/2025

(स.द.डावखर)
उपकुलसचिव